**परिपत्रक नं.३६**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
आस्थापना माध्यमिक विभाग
**दिनांक -२६/०९/२०१७**

शाखाप्रमुख,
प्राथमिक, माध्यमिक, अध्यापक विद्यालये व उच्च माध्यमिक विद्यालये,
रयत शिक्षण संस्था,

यांना------

**विषय :- मुख्याध्यापकाचे नोडयूजबाबत.**

उपरोक्त विषय संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते कीं, रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक, अद्यापक विद्यालये, तसेच माध्यमिक विद्यालयास संलग्नीत असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापकाची जबाबदारी पार पाडून नियत वयोमानानुसार संस्थेच्या सेवेतून प्रत्येक वर्षी सुमारे ७५ ते ८० मुख्याध्यापक सेवानिवृत्त होत असतात. मुख्याध्यापकांना सेवानिवृत्त होणेसाठी त्यांनी सेवा केलेल्या शाखामधील नो डयुज मिळणे आवश्यक असते. सदरचे शाखाप्रमुख हे ज्या शाखेत काम करीत असतात. तेथून त्यांची ज्यावेळी बदली होते. त्यावेळी ते आपल्या शाखेत झालेल्या ऑडिट रिपोर्टमध्ये असणा-या त्रुटीची पूर्तता झाली किंवा कसे हे पहात नाहीत. ज्यावेळी त्यांना त्या शाखेचे नोडयुजची गरज पडते त्यावेळी तेथील मुख्याध्यापक सांगतात की तुमचे मुख्याध्यापकाचे कालावधीतील ऑडिट रिपोर्टमधील कांही सूचनाची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे तुम्हांस नोडयुज देता येत नाही. तुम्ही ऑडिट रिपोर्टची पूर्तता करावी. त्यानंतर तुम्हांस नोडयुज देता येईल. ऑडिट रिपोर्टमधील त्रुटींची पूर्तता लवकर होत नसल्यामुळे त्या शाखाप्रमुखास सेवानिवृत्तीपूर्वी सर्व सेवेतील नोडयुज मिळविणे अवघड होत आहे. आता संस्थेने सेवानिवृत्त होणा-या मुख्याध्यापकांचे बाबतीत असा निर्णय घेतला आहे कीं, संस्थेमध्ये सेवानिवृत्त होणा-या मुख्याध्यापकांनी आपण केलेल्या आपल्या सेवाकालातील प्रत्येक शाखेचे ऑडिट रिपोर्टची पूर्तता सहा महिने अगोदर करावी. ज्या मुख्याध्यापकांनी सहा महिने अगोदर ऑडिट रिपोर्ट मधील सूचनांची पूर्तता करणार नाहीत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यांत येईल. ऑडिट रिपोर्टची पूर्तता वेळेत न झालेस व संबंधित शाखेचे नोडयूज वेळेत न मिळाल्यामुळे सेवानिवृत्तीचा प्रस्ताव वेळेत पाठविता आला नाही तर त्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सहसचिव,(माध्य.)
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी ----
१. मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.
२. मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
३. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा.
४. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग, सांगली.
५. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर.
६. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे.
७. इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे (पनवेल)